# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२१ साठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या नाव, जन्मतारीख, विषय व तत्सम माहितीमधील दुरुस्त्यांबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२१ कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उदभवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्र.परीक्षा ०६२१/प्र.क्र.४६/एसडी-२ दि.११/०६/२०२१ अन्वये रद्द करण्यात आली आहे. तद्नंतर विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन कार्यपध्दतीबाबतचा तपशील शासन निर्णय क्रमांक परीक्षा ०६२१/प्र.क्र.५६/एसडी२ दि.०२/०७/२०२१ नुसार जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार राज्य मंडळाने मूल्यमापन कार्यपध्दतीसंदर्भात दि.५/०७/२०२१ च्या परिपत्रकाव्दारे तपशीलवार सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तत्पूर्वी सन २०२१ परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत दि.०३/०४/२०२१ रोजी ऑनलाइन प्रवेशपत्र देण्यात आलेली आहेत. सदर प्रवेशपत्रामध्ये १) विषय/माध्यम २) फोटो ३)विद्यार्थ्याची स्वाक्षरी ४) विद्यार्थ्याचे नाव ५) जन्मतारीख व ६) इतर तत्सम दुरूस्त्या असल्यास याबाबत संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे संबंधित विभागीय मंडळाकडे दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक व सर्व माध्यमिक शाळा यांना आपल्या स्तरावर सूचित करावे. सर्व विभागीय मंडळांनी यासंदर्भातल्या दुरूस्त्या विभागीय मंडळातील/निर्धारित गणकयंत्र विभागामार्फत करून राज्य मंडळाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार राज्य मंडळाच्या गणकयंत्र विभागाकडे पाठवाव्यात.

तरी उपरोक्तप्रमाणे दुरुस्त्या करणेबाबत सर्व माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक ,विद्यार्थी, शिक्षक, पालक व इतर संबंधित घटक इत्यादींनी नोंद घ्यावी.

( डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

क्र.कोविमं/ इ.१२वीपरीक्षा/ ६०३
कोल्हापूर ४१६००४
दिनांक १८/०७/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

इयत्ता १२ वी सन २०२१ परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या नावांत, जन्मतारीख, विषय, माध्यम अन्य तत्सम दुरुस्त्या असतील तर दुरुस्तीचे प्रस्ताव तातडीने या विभागीय मंडळ कार्यालयाकडे तातडीने सादर करावयाचे आहे. त्यासंदर्भात वरील प्रकटनाची नोंद घेवून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

विभागीय सचिव
म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४.